# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/०५/२०१८
## दि.२३/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ६११/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | रंजीन बरेला,वय ३३ वर्षे,रा.वडकी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात डंपर चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/१८ रोजी सकाळी १०/०० वा.चे सुमारास हांडे लॉन्स,हांडेवाडीच्या समोर हडपसर पुणे |
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी यातील फिर्यादी हे मोटार सायकलवरुन त्यांचे पत्नी (मयत) नामे-बालीबाई रंजिन बरेला,वय २८ वर्षे,रा.धाडसी मोडक यांच्या खोलीत महाराष्ट्र बॅंकेच्या समोर वडकी,पुणे, मुळ रा. मु.पो.काकोडा, ता.पंधना,जि.खाडबा,मध्यप्रदेश हिचेसह जात असताना, डंपर चालकाने फिर्यादी यांचे मोटार सायकलला धक्का दिल्याने फिर्यादी यांचा तोल जावुन, फिर्यादी यांची पत्नी डंपरच्या चाकाखाली जावुन, गंभीर जखमी होवुन,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेंडगे ९८२३९२३६१८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे १६९/१८,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | एम.जी सासवडे,सहा.पोलीस फौजदार,विमानतळ,पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपी** | १) शेखर मल्हारी २) हरिप्रसाद प्रेमसिंग भंडारी (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०५/२०१८ रोजी दुपारी १३/३० वा.चे सुमारास काव्या जलतरण तलाव श्रीराम सोसायटी चाटे शाळेच्या बाजुला खराडी बायपास चौक, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता. वेळी व ठिकाणी यातील मयत इमस नामे-अविनाश पांडुरंग शिवचरण, वय ३१ वर्षे,रा.समता सोसायटी गणेश नगर वडगावशेरी,पुणे यास पोहता येत नसले बाबत तेथील मॅनेजर शेखर मल्हारी व लाईफ गार्ड हरिप्रसाद प्रेमसिंग भंडारी यांना माहिती देवुन सुध्दा त्यांनी त्यांच्या कर्तव्यामध्ये कसुर केल्याने यातील मयत इसम अविनाश पांडुरंग शिवचरण हा त्यांच्या निष्काळजीपणामुळे पाण्यात बुडुन मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एम.आठर ८२७५२०१५२१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३५४/१८,भादविक ३२४,३४१,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,५०६, महा.पो.का. क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रीमी. लॉ.अमेंडमेंट ॲक्ट ७ |
| **फिर्यादी** | युवराज मावळे,वय २२ वर्षे,रा.चिखली,पुणे |
| **आरोपी** | १)तुषार भंडारी, २) योगेश लहाने, ३) गणेश तोरसकर,तिघे रा.मोरेवस्ती, चिखली,पुणे, ४)आकाश शिंनगारे, रा.भिमशक्तीनगर, मोरेवस्ती,चिखली,पुणे ५)शुभम वायके, ६)धम्या, रा. रामनगर, चिंचवड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०५/२०१८ रोजी रात्रौ १९/४५ वा.चे सुमारास जॉगर्स पार्क, संभाजीनगर, चिंचवड,पुणे येथील मेन गेट समोर, सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी जुन्या भांडणाच्या कारणावरुन बेकायदेशीर जमाव जमवुन,यातील फिर्यादी यांचा भाऊ-धनंजय धोडीबा मावळे, यास जॉगर्सपार्क, संभाजीनगर, चिंचवड,पुणे येथील मेन गेट समोर, सार्वजनिक रोडवर आडवुन त्यास मारहाण करीत असताना सदर मारहाण सोडविण्यासाठी यातील फिर्यादी व त्यांचा |

| | |
|---|---|
| | मित्र इरशाद शाबीर खान असे तेथे गेले असताना, यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचेशी वाद घालुन सदर भांडणात इसम नामे योगेश लहाने याने अचानक एक दगड उचलुन फिर्यादी यांचा भाऊ धनंजय याचे डोक्यात मारला व तुषार भंडारी याने त्याचे हातातील लोखंडी चाकुने यातील फिर्यादी यांचा मित्र इरशाद खान याला पाठीत व त्याचे हातावर मारुन त्यास जखमी केले व त्यानंतर त्यांनी त्यांचेजवळील हत्यारे दाखवित आरडाओरडा करीत जॉगर्स गार्डनकडे पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. योगेश आव्हाड ९१९३७९७१०४ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १५३/१८,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | रोहित चव्हाण, वय २७ वर्षे,रा.सुपर बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१८ रोजी १३/३० वा.ते १३/४५ वा.चे दरम्यान शाहु बँक चौक, बालाजी नगर, धनकवडी पुणे येथे युनियन बँकेच्या एटिएम मध्ये |
| **तपशिल** | वर नमुद ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हे युनियन बँकेच्या एटीएम मध्ये पैसे काढत असताना, त्यांच्या एटीएम कार्डाचा पिनकोड क्रमांक एटीएम मशिनवर प्रेस करताना एका अनोळी इसमाने पाहिला. फिर्यादी यांना एटीएम मधून पैसे न मिळाल्याने, अनोळखी इसमाने एटीएम कार्ड कसे वापरायचे? 'हे दाखविण्याचा बहाणा करून, फिर्यादीच्या पाठीमागे उभे असलेल्या दोन अनोळखी तरुणांपैकी एका तरुणाने, फिर्यादीकडून एटीएम कार्ड घेवून, ते अनोळखी इसमाने त्याच्या शर्टास पुसुन, त्याने एटीएम कार्ड फिर्यादीस परत देताना हातचलाखीने त्यांच्या एटीएम कार्डाऐवजी युनियन बँकेचे दुसरे एटीएम कार्ड दिले व सदर एटीएम कार्डाचा वापर करुन, फिर्यादीच्या खात्यावरील प्रत्येकी ५०००/- रुपये दोन वेळा काढून, एकुण १० हजार रुपयांची फसवूणक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि.बी.कोळी ७७७४९४७४५४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे २३३/१८,भादविक ४१९,४२०, माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | पंकज चिमुरकर, वय २७ वर्षे,रा. नागपुर रोड,ब्रम्हापुरी, जि.चंद्रपुर |
| **आरोपी** | १)अभिषेक गुप्ता, २)निखील विजय कुलकर्णी, ३)दोन महिल (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑगस्ट २०१७ ते दि.०५/१२/२०१७ या कालावधीत आनंदविहार कॉलनी, -१ हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी नोकरी डॉट कॉम या वेबसाईटवर ॲप्लीकेशन केलेनंतर फिर्यादीस दि.१९/०९/२०१७ रोजी यातील नमुद एका महिलेने फिर्यादी यांना फोन करुन, फिर्यादीचे आयबीएम हिंजवडी पुणे येथील कंपनीत नेटवर्क इंजीनीअर म्हणुन सिलेक्शन झालेचे भासवुन तसे दि.२६/१०/२०१७ रोजी फिर्यादीस त्यांचे ई-मेल वर ड्युटी जॉईन करणेचे पत्र पाठवुन, फिर्यादीचे जॉबचे रजिस्ट्रेशन करणेसाठी २ हजार ५००/- रुपये ऑनलाईन भरण्यास भाग पडुन त्यानंतर वेळोवेळी यातील नमुद इसम व महिला यांनी फिर्यादीस आयबीएम कंपनीतील ऑफर केलेल्या नेटवर्क इंजीनीअर या जॉबसाठी आयबीएम कंपनी सोबत प्रोफाईल लिंक करणेकामी, इंटरव्युव्ह क्रॅक करणेसाठी, सिक्युरीटी बॉंड करणेकामी फिर्यादीचा हेल्थ इंन्सुरन्स करणेसाठी व आयबीएम कंपनीतील सदरचा जॉब हा दुसऱ्या इसमास दिल्याचे कारण सांगुन व फिर्यादीने भरलेले पैसे रिफंड करावयाचे आहेत असे फिर्यादीस लालच देवुन भरलेली रक्कम रिफंड करणेसाठी जीएसटी भरणे गरजेचे आहे असे फिर्यादस भासवुन फिर्यादीकडुन वेळोवेळी एकुण १ लाख ४४ हजार ७०५/-रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) बी.एल.खोडदे ९९२३७९५८४६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ३६७/१८,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ४४ वर्षे,रा.पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | अरिचीत देसाई, वय ४३ वर्षे,रा.मुंबई (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१२/२०१७ रोजी ते आज रोजी पर्यंत पिंपरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी लग्ना करीता शादी डॉट कॉम या वेबसाईटवर नाव नोंदणी केली होती. त्यावेळी यातील नमुद इसम अरिचीत देसाई व यातील फिर्यादी यांची ओळख झाली होती. अरिचीत याने फिर्यादी यांना मी सॅाफ्टवेअर कंपनीत कामास असुन, महिन्याचा पगार २ लाख ५० हजार रुपये आहे. त्याचे आई वडिल अमेरीकेत आहे.तसेच मी तीन महिन्यांनी ऑस्ट्रेलीया येथे जाणार आहे. त्यामुळे मला लवकरात लवकर लग्न करावयाचे आहे. असे सांगुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, फिर्यादी यांना पुण्यामध्ये वाकड या ठिकाणी घर घेवु असे सांगुन फिर्यादी यांचेकडुन ३ लाख ४० हजार रुपये तसेच एक सोन्याची चैन घेवुन मुंबई येथे निघुन जावुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) काळे ९५५२४८८०६१ |

## दि.२४/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४५४/१८,भादविक ३९२,३४,४२७ |
| **फिर्यादी** | महेश तारु,वय ४३ वर्षे,रा.थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | १)करण शिंदे, २)चिक्या सुर्यवंशी, ३)नवनाथ भांनकुटे, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१८ रोजी सकाळी ११/१५ वा.चे सुमारास नम्रता हौसिंग सोसायटी शिक्षक कॉनली थेरगाव,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवरुन येवुन फिर्यादी यांचे गाडीची तोडफोड करत असताना,फिर्यादी यांनी त्यांना आडविण्याचा प्रयत्न केला असता, त्यापैकी एका इसामाने फिर्यादी यांना कोयत्याचा धाक दाखवुन, फिर्यादी यांचे खिशातील रोख रक्कम १ हजार रुपये घेवुन जात असताना, रोडवर पार्क केलेल्या ६ ते ७ तीनचाकी, चारचाकी गाडयांची तोडफोड करुन, एकुण अंदाजे १० ते १२ हजार रुपयाचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. भोगम ९६८९४८३०७९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे १४९/१८,भादविक ४३६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ५५ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | दादा कुडले, व त्याचा साथीदार, (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०१८ रोजी पहाटे ०३/०० वा.चे सुमारास पीएमसी कॉलनी, शास्त्रीनगर, कोथरुड पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या लघुशंकेसाठी उठल्या असताना, यातील नमुद इसम व त्याचा साथीदार यांनी जुन्या भांडणाच्या करणावरुन फिर्यादी यांचे घराला आग लावुन घराबाहेर पार्क केलेल्या फिर्यादी यांच्या मुलाची बुलेट व दोन ॲक्टीव्हा मोटार सायकल, व सीसीटीव्ही कॅमेराचे तोडफोड करुन नुकसान केले आहे. तसेच रस्त्यावर पार्क केलेल्या एका ॲक्टिव्हा मोटार सायकलचे तोडफोड करुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. एस.एस.धोत्रे ८४२२९९५१५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १३३/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | सौ.सिमा बुलबुले,वय ४४ वर्षे,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१८ रोजी सकाळी १८/३० वा.ते सांय.०६/३० वा.चे दरम्यान सरस्वती अपार्टमेंट च्या समोर विनायकनगरी १३ ताडीवाला रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप बनावट चावीच्या सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख २ लाख ५० हजार रुपये व सोन्याचे, डायमंडचे दागिने असा एकुण ५ लाख १८ हजार ७५०/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.ए.गायकवड ९४०५२४७५९७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**